.. advaita pratyaya ..

॥ अद्वैत प्रत्यय ॥

लतीफ् अशाह

Latif Shah was a 16th Century muslim saint who was a Rambkakta.
His samAdhi isat m.ngaLaveDhe.

आतां पूजा कोठें वाहूं । पाहतां देहीच ज्हाला देवु ॥
भावें पूजन करितां । देहीं देव जाला तत्त्वतां ॥
तोडूं गेलों तुळसीपान । तेथें अवघा मधुसूदन ॥
अत्र गंध पुष्प धूप । अवघे विठ्ठलस्वरूप ॥
फळ ता म्बूळ नैवेद्य । पाहता अवघाचि गोविंद ॥
म्हणे लतीफ ब्रह्मज्ञानीं । अवघा पाहता चक्रपाणी ॥

लतीफशाह हा धर्माने मुसलमान असला तरी रामभक्त होता.
मंगळवेढे येथे लतीफशाहची समाधी आहे.

Encoded and proofread by Yadunath Moharir dryadu1 at yahoo.com
BSK Vol. 8 pp. 315